10 वी नंतर... स्पर्धा परीक्षांची तयारी करायची आहे?
All India स्पर्धा लाखोंमध्ये आहे... जर AIR Rank मिळवायचा असेल तर,
तयारी लवकरच सुरू करावी लागेल!
तेव्हाच लाखो विद्यार्थ्यांना मागे टाकता येईल.
सादर करीत आहोत
फाउंडेशन बॅच
8 वी ते 10 वी - डेली फाउंडेशन
6 वी ते 10 वी - विकेंड फाउंडेशन
डेमो क्लासेस उपलब्ध. एप्रिल 18 व 19, 2026
बॅचेस आणि प्रवेश सुरू...
अधिक माहिती जाणून घेण्यासाठी आजच भेट द्या.
7501-988-988

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

ज्ञानासोबत कौशल्य, चारित्र्य आणि समर्पण...
श्री सांदिपनी अकॅडमी
ISO 9001 : 2015
MORE THAN 10 YEARS OF EXCELLENCE
IIT-JEE | NEET | MHT-CET साठी सर्वाधिक विश्वासार्ह आणि गुणवत्तापुर्ण अकॅडमी
• NEET साठी 5 दिवसांचा फ्री डेमो क्लासेस. अनुभव घेऊन निर्णय घ्या! •
• 11वी साठी JEE आणि NEET बॅचेस 16 एप्रिल पासून सुरू होत आहेत. •

10वी ते 11वीत जाणाऱ्या JEE विद्यार्थ्यांसाठी,
मोफत ब्रिज कोर्स
16 एप्रिल पासून सुरू...
10वी नंतरचा Strong Foundation तयार करा.
11वी + JEE ची सुरुवात करा आत्मविश्वासाने...
वरील ब्रिज कोर्स हा 1 मे 2026 पासून सुरू होणाऱ्या बॅच साठी आहे.
QR कोड स्कॅन करा आणि आपली जागा निश्चित करा.
7501-988-988
shrisandipaniacademy.in
drbalrajukarri.coach

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १५.०४.२०२६ | अंक नं. १३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# 'ध्येय मल्टीस्टेट'च्या गुन्ह्यातील आरोपी २ वर्ष झाले तरी पोलिसांना सापडेना

## तपासही थंडावल्याने ठेवीदार चिंताग्रस्त, आरोपींना अटक करून मालमत्ता जप्त करण्याची मागणी

नगर – नगर शहरासह जिल्ह्यात 'ध्येय मल्टीस्टेट'च्या शाखा सुरु करून ठेवीदारांना ज्यादा परताव्याचे आमिष दाखवत कोट्यावधी रुपयांच्या ठेवी गोळा करून त्या परत न देता सर्व शाखा बंद करून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल होवून तब्बल २ वर्ष होत आली आहेत. तरीही या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असलेला चेअरमन विशाल भागानगरे अद्यापही फरार असून तो तोफखाना पोलिसांना सापडत नाही. आता तर या गुन्ह्याचा तपासही थंडावला असल्याने ठेवीदार चिंतेत असून भागानगरे सह अन्य आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्या मालमत्ता जप्त करण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे.

'ध्येय मल्टीस्टेट' कडून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केल्याप्रकरणी ठेवीदार सुजाता संदीप नेवसे यांनी १६ मे २०२४ रोजी नगरच्या तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिलेली आहे. त्यावरून ११२ ठेवीदारांची ५ कोटी ७८ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरे याच्यासह ७ संचालकांच्या विरुद्ध दाखल झालेला आहे. त्यानंतर अपहाराची रक्कम आता ७ कोटी ६ लाख ३० हजारांवर पोहोचली आहे. या रकमेत अजूनही वाढ होण्याची शक्यता आहे. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलिसांकडून अतिशय संथ गतीने आणि आरोपींना सहाय्य होईल अशा पद्धतीने सुरु असल्याचा आरोप ठेवीदारांकडून केला जात आहे.

पोलिसांच्या या भूमिकेमुळेच २ संचालकांना अटकेपासून संरक्षण मिळालेले आहे. यातील एक आरोपी व्हाईस चेअरमन रोहिदास सत्यदेव कवडे याला गुन्हा दाखल झाल्यावर तब्बल ९ महिन्यांनंतर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिसांनी अटक केली. मात्र आता २ वर्ष होत आले तरी मुख्य सूत्रधार आणि संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरे सह इतर आरोपी अजूनही मोकाट फिरत आहेत. पोलिसांना ते का सापडत नाहीत? या मागील गौडबंगाल काय? असा सवाल ठेवीदार करत आहेत. या गुन्ह्याचा तपास योग्य रीतीने होवून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत यासाठी हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी ठेवीदारांनी अनेकदा केली. मात्र त्यांनाही तोफखाना पोलिसांनी तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपींच्या सारखी वागणूक देत वेळोवेळी वाटे लावले आहे. त्यामुळे तोफखाना पोलिसांची भूमिकाही संशयास्पद असून आता पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी यात लक्ष घालून ठेवीदारांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी ठेवीदार करत आहेत.

### आरोपी व त्यांच्या कुटुंबियांच्या मालमत्ता जप्त कराव्यात

ठेवीदारांनी नुकतीच तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. जगदीश भांबळ यांची ही भेट घेत या गुन्ह्याच्या तपासाला गती द्यावी, आरोपींना तातडीने अटक करावी, आरोपी हे त्यांच्या मालमत्तांची विल्हेवाट लावत असून त्या संदर्भात संबंधित यंत्रणेशी पत्रव्यवहार करून आरोपींच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या मालमत्ता जप्त कराव्यात. तसेच त्यांनी यापूर्वी त्यांच्या मालमत्ता कोणाला विकल्या याचाही तपास करावा अशी मागणी केली आहे. यावेळी फिर्यादी सुजाता नेवसे, सीताबाई सरोदे, जालिंदर पवार, बापू गायकवाड, महेश तरटे, भाऊसाहेब कासार, अरुण लबडे, स्वप्निल आगरकर आदींसह इतर ठेवीदार उपस्थित होते.

आमचे लाडके युवा नेते
धडाडीचे युवा नेतृत्व आमचे
नंदादीप तेजोमय संपन्न कार्याचे
जयवंत... यशवंत... शतायू व्हावे
यशस्वीतेचे शिखर आपणास लाभावे..!
१५ एप्रिल
मा.श्री. धनंजय विष्णुशेठ फुलसौंदर
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
वैष्णव मित्र मंडळ | नक्षत्र प्रतिष्ठान
बुरुडगांव रोड, अहिल्यानगर.



नगर तालुक्यातील सारोळा कासार – अकोळनेर शिवेलगत असलेल्या जांभळदरा परिसरात आग लागून शेतकऱ्यांच्या फळझाडे व शेती साहित्याचे झालेले नुकसान.

# आगीच्या वणव्यात शेतकऱ्यांच्या फळझाडांचे झाले मोठे नुकसान

## पाईप, शेततळ्याचे कागद, विहिरी, बोअरवेलच्या पाईपलाईनही जळाल्या

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार – अकोळनेर शिवेलगत असलेल्या जांभळदरा परिसरात १४ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास वणवा पेटून मोठी आग लागली. या आगीत परिसरातील ९ शेतकऱ्यांच्या शेतातील फळझाडे व इतर प्रकारची झाडे होरपळून निघाली, तर या शेतकऱ्यांच्या शेतातील ठिबक चे पाईप, शेततळ्याचे कागद, विहिरी, बोअरवेलच्या पाईपलाईनही जळाल्या असून या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

दुपारी ३ च्या सुमारास लमाणबाबा देवस्थान पासून काही अंतरावर असलेल्या डोंगरावर अचानक वणवा पेटला. दुपारी वेळ आणि कडक उन त्यामुळे आगीने काही काळातच रौद्र रूप धारण केले. डोंगरावरून ही आग जवळच असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात पसरली. परिसरातील नागरिकांना आगीच्या ज्वाला व धुराचे लोट दिसू लागल्यावर नागरिकांनी तिकडे धाव घेतली. मात्र आग विझवण्यासाठी कुठलीही साधने उपलब्ध नसल्याने आणि आगीने रौद्र रूप धारण केलेले असल्याने नागरिकांना काहीच करता आले नाही.

या आगीत सुधाकर रंगनाथ धामणे यांच्या शेतातील चंदन, कडूनिंब, मलबारलिंब आदी झाडे, विशाल मधुकर धामणे, सुभाष भास्कर धामणे, विलास गंगाधर धामणे, वनाजी गंगाधर धामणे या शेतकऱ्यांच्या शेतातील चिंचेची झाडे, संजय आप्पासाहेब धामणे यांच्या शेतातील संत्र्याची बाग, ज्ञानदेव भाऊसाहेब धामणे व पोपट भाऊसाहेब धामणे यांच्या शेतातील आंब्याची बाग, राजेंद्र आप्पासाहेब धामणे यांच्या शेतातील आंब्याच्या झाडांचे नुकसान झाले आहे. या शिवाय या सर्व शेतकऱ्यांच्या शेतात ठिबक सिंचनाचे अंथरलेले पाईप, विहिरी, बोअरवेलच्या पाईपलाईन, शेततळ्यातील कागद व पाईपलाईन आदी शेती साहित्य जळून मोठे नुकसान झाले आहे.

### आग लावली की लागली याच्या चौकशीची मागणी

ही आग कशामुळे लागली, की कोणी लावली याची प्रशासनाने सखोल चौकशी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या परिसरात रस्त्यालगत असलेल्या हॉटेल मधून दुपारी काही जणांनी दारू घेवून ते दारू पिण्यासाठी डोंगराच्या बाजूला गेले होते. त्यातीलच कोणी सिगारेट ओढून तेथे टाकून दिली असावी किंवा मुद्दामहून आग लावली असावी अशीही शंका शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने याची सखोल चौकशी करावी, तातडीने पंचनामे करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी अशी मागणीही शेतकऱ्यांनी केली आहे.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज

सुवर्णखरेदी अक्षय्यसुखाची..
फायदाच फायदा !
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
2014 पासून आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## ग्रामपंचायत कार्यालयासमोर मद्यधुंद अवस्थेत आरडाओरड करणाऱ्याला पोलिसांनी पकडले

नगर - सार्वजनिक ठिकाणी मद्याचे सेवन करून आरडाओरड करणाऱ्या एका व्यक्तीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. खातगाव टाकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर ही घटना घडली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ एप्रिल रोजी दुपारी १२.४५ वाजेच्या सुमारास खातगाव टाकळी येथील ग्रामपंचायत कार्यालय परिसरात आरोपी सचिन आबासाहेब सातपुते (वय ४३, रा. खातगाव टाकळी, ता. नगर) हा मद्यधुंद अवस्थेत आढळून आला. आरोपीने मद्याच्या नशेत सार्वजनिक ठिकाणी आरडाओरड करून बेशिस्त वर्तन केले. यामुळे परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस कॉन्स्टेबल उमेश दगडू शेरकर यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सचिन सातपुते याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ८५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहायक पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार नंदकिशोर सांगळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## वेतन विलंबामुळे शिक्षकांमध्ये संतापाची लाट; दोन दिवसांत तोडगा न निघाल्यास ‘आंदोलन’

### वेतन हा हक्क, विलंब असह्य - सुनील गाडगे यांचा इशारा

नगर - शालार्थ प्रणालीतील तांत्रिक अडचणींचा दाखला देत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वारंवार विलंबाने दिले जात असल्याने जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. यासंदर्भात शिक्षक भारती संघटनेच्या वतीने शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देण्यात आले असून, तात्काळ वेतन वितरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

फेब्रुवारी २०२६ महिन्याचे वेतन १३ मार्चनंतर वितरित करण्यात आले, तर मार्च महिन्याचे वेतन बिल अद्यापही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः गृहकर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने दंडाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

शिक्षण विभागाकडून कागदपत्रांचे डिजिटायझेशन, ई-केवायसी प्रक्रिया, अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन, मंजूर पदांच्या मर्यादा आदी कारणे देत वेतन प्रलंबित ठेवण्यात येत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र या तांत्रिक प्रक्रियांना पूर्णत्वास नेण्यासाठी किमान पाच ते सहा महिने लागण्याची शक्यता असून, तोपर्यंत शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याचे शिक्षक भरतीचे राज्य सचिव सुनील गाडगे यांनी सांगितले.

विशेषतः शून्य शिक्षकी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवण्यात आले असले, तरी त्या शाळांमध्ये अध्यापन सुरू असून, परीक्षा व मूल्यमापनाची कामे सुरू आहेत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवू नये, अशी मागणी करण्यात आली आहे. तांत्रिक अडचणींचे निराकरण समांतर पद्धतीने सुरू ठेवत वेतन वेळेवर देणे ही शिक्षण विभागाची नैतिक जबाबदारी असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

शिक्षक भारती संघटनेने वेतन वितरणात होणाऱ्या विलंबाचा तीव्र निषेध नोंदवला असून, पुढील दोन दिवसांत वेतन न झाल्यास संबंधित कार्यालयासमोर निदर्शने करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाला जिल्हा स्तरावर पाठिंबा देण्यात आला असून, विविध पदाधिकाऱ्यांनी या मागणीस समर्थन दर्शवले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीत बोलताना सुनील गाडगे यांनी शिक्षण विभागाच्या धोरणांवर टीका केली. वेतन हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा मूलभूत हक्क आहे. तांत्रिक अडचणींच्या नावाखाली पगार रोखणे ही अन्यायकारक बाब असून, यामुळे कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्यावर परिणाम होत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ते पुढे म्हणाले, डिजिटायझेशन, ई-केवायसी किंवा समायोजन या प्रक्रिया आवश्यक असल्या, तरी त्या समांतर पद्धतीने पूर्ण करता येऊ शकतात. त्या कारणास्तव कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित ठेवणे योग्य नाही. शिक्षण विभागाने तातडीने यावर निर्णय घेतला नाही, तर शिक्षक रस्त्यावर उतरून आंदोलन करतील.

शिक्षकांच्या सहनशीलतेची परीक्षा घेऊ नये. दोन दिवसांत वेतन वितरण न झाल्यास संघटना तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा सुनील गाडगे, जिल्हाध्यक्ष आप्पासाहेब जगताप, जिल्हा सचिव विजय कराळे, कार्याध्यक्ष महेश पाडेकर, संजय पवार, सोमनाथ बोंतले, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, योगेश हराळे, नवनाथ घोरपडे, सचिन शेलार, सुदाम दिघे, मोहंमद समी शेख, रामराव काळे, संभाजी पवार, हनुमंत रायकर, सिकंदर शेख, संतोष देशमुख, किसन सोनवने, संतोष शेंदुरकर, संभाजी चौधरी, श्रीकांत गाडगे, रेवण घंगाळे, विभावरी रोकडे, मीनाक्षी सूर्यवंशी, रोहिणी भोर, शकुंतला वाळुज, छाया लष्करे, जया गागरे, अनघा सासवडकर, रूपाली बोरुडे, सोनाली अकोलकर तसेच विनाअनुदानित शाळांचे राज्याध्यक्षा रूपाली कुरूमकर आदींनी दिला.

## शेअर बाजारात सेन्सेक्स १३०० तर निफ्टी ४०७ अंकांनी वधारला

मुंबई - अमेरिका आणि इराण यांच्यात पुढील फेरीची चर्चा होण्याचे भारतीय शेअर बाजारावर सकारात्मक परिणाम दिसत आहेत. १५ एप्रिल रोजी, देशांतर्गत बाजाराने जोमाने सुरुवात केली. आशियाई बाजारपेठा जोरदार वाढीसह उघडल्या तर, भारतीय बाजारातही सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकात अतिउत्साही रॅली पाहायला मिळत आहे. सेन्सेक्स आणि निफ्टी १% पेक्षा जास्त वाढीसह उघडले. सेन्सेक्स १३०० अंकांनी वाढून ७८,२०६ अंकांवर पोहोचला, तर निफ्टी ४०७ अंकांच्या तेजीसह २४,२५० अंकांवर आला.

इराण आणि अमेरिकेत परिस्थिती पुन्हा सर्वसामान्य होण्याच्या अपेक्षेमुळे भारतीय बाजारात खरेदी दिसून येत आहे. सर्व क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये तेजी दिसून येत असताना निफ्टी मेटल, निफ्टी पीएसयू बँक आणि आयटी या सर्व क्षेत्रीय २% पेक्षा जास्त वाढ झाली. यादरम्यान बँक निफ्टी निर्देशांक ७३८.४० अंकांनी किंवा १.३३% च्या वाढीसह ५६,३४३.४५ वर उघडला.

निफ्टीमध्ये इंडिगो, हिंडाल्को आणि श्रीराम फायनान्स टॉप ठरले व अनुक्रमे ४-३ टक्के वाढीसह व्यवहार करत आहेत. तसेच निफ्टी मध्ये रेड्डीज, ओएनजीसी आणि कोल इंडिया या शेअर्समध्ये सर्वाधिक घसरण झाली. डॉ. रेड्डीजच्या शेअर्समध्ये २% पेक्षा जास्त घसरण झाली.

### आशियाई बाजारात गुंतवणूकदारांचा जोश

आशियाई बाजारांबद्दल बोलायचे तर १५ एप्रिल रोजी दक्षिण कोरियाच्या कोस्पी ने २.९२% च्या जोरदार वाढीसह आघाडी घेतली, तर तैवान भारित निर्देशांक १.९४%, हाँगकाँगचा हँग सेंग १.०३% वाढला. त्याचवेळी, जपानचा निक्केई ०.५२% वाढीसह ट्रेड करत असताना चीनच्या शांघाय कंपोझिटमध्ये देखील किंचित वाढ नोंदवली गेली. अशाप्रकारे, आशियामध्ये गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास मजबूत असल्याचे दिसत आहे.

दुसरीकडे, युएस फ्युचर्स इंडेक्समध्येही तेजी दिसून येत असून कच्च्या तेलाच्या किमतीत लक्षणीय घट झाल्यामुळे डॉलर इंडेक्स नरम पडला. अशा परिस्थितीत, सर्व घटक बुधवारी भारतीय बाजारातही जोरदार खरेदी होण्याची शक्यता असल्याचे संकेत देत आहेत.

## एमआयडीसीतील वर्कशॉप फोडून चोरी

नगर - येथील नागापूर एमआयडीसी परिसरातील अ- ५८ मधील पल्लवी इंटरप्रायजेस हे वर्कशॉप फोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे २० हजार रूपयांच्या मशिनरी टूल्स चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. सदरची घटना १२ एप्रिल रोजी सायंकाळी सात ते १३ एप्रिल रोजी सकाळी आठच्या दरम्यान घडली असून यासंदर्भात एमआयडीसी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत नंदकुमार श्रीधर भोसले (वय ४८, रा. भिस्तबाग, सावेडी, अहिल्यानगर, हल्ली रा. साईश्रध्दा कॉलनी, म्हस्के कॉलेज, बोल्हेगाव) यांनी फिर्याद दिली आहे. भोसले यांची एमआयडीसीतील अ- ५८ मध्ये पल्लवी इंटरप्रायजेस नावाचा वर्क शॉप आहे. अज्ञात चोरट्याने वर्क शॉप मागील बाजूने प्रवेश करून लॅन्थ मशिनसाठी वापरात येणारे सुमारे २०० नग टूल्स चोरी करून नेले असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

## फ्लॅट खरेदीच्या आमिषाने व्यावसायिकाची ५ लाखांची फसवणूक

नगर - स्वस्तात फ्लॅट देण्याचे आमिष दाखवून एका व्यावसायिकाची पाच लाख रूपयांची फसवणूक केल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात १३ एप्रिल रोजी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नाजिश अजाउद्दीन ईनामदार (वय ३६, रा. कोठला बारा इमाम) यांनी फिर्याद दिली आहे. फारूक शरीफ शेख (रा. भिकनवाडा, पाथर्डी), कपिल सतीशचंद्र अग्रवाल, लव सतीशचंद्र अग्रवाल, अंकुश सतीशचंद्र अग्रवाल (रा. पाथर्डी), कपिल अग्रवाल याचा मेव्हणा विशाल (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. व्यवसायाच्या निमित्ताने फिर्यादी ईनामदार यांची ओळख शेख याच्याशी झाली होती. त्याच्यामार्फत इतर संशयितांशी परिचय झाला.

फिर्यादीस अहिल्यानगरमध्ये फ्लॅट खरेदी करायचा असल्याचे समजल्यावर संबंधितांनी सावेडी येथील एका अपार्टमेंटमधील फ्लॅट स्वस्त दरात मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानुसार १५ लाख रूपयांत सौदा ठरवण्यात आला. सुरूवातीला १० लाख रूपये रोख देण्याची अट घालण्यात आली. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी नोटरीसमोर साठेखत तयार करून फिर्यादीकडून त्यांच्या राहत्या घरी १० लाख रूपये रोख स्वरूपात घेण्यात आले. उर्वरित पाच लाख रूपये फ्लॅट ताब्यात देताना देण्याचे ठरले होते. मात्र नंतर साठेखताऐवजी कर्ज व्यवहाराचा उल्लेख असल्याचे लक्षात आले.

याबाबत विचारणा केल्यावरही कोणतीही अडचण येणार नसल्याचे आश्वासन देण्यात आले. वारंवार मागणी करूनही खरेदीखत नोंदणी करण्यात टाळाटाळ करण्यात आली. फिर्यादीने पैसे परत मागितले असता, पाच लाख रूपये धनादेशाव्दारे परत करण्यात आले. मात्र उर्वरित पाच लाख रूपये परत करण्यास नकार देण्यात आला, असे फिर्यादीत नमूद आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी आरोपींच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

### पेंटय्या दासरी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - झारेकरगल्ली येथील रहिवाशी पेंटय्या लक्ष्मण दासरी (वय ६७) यांचे १५ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, दोन मुली, एक मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. व्यंकटेश दासरी यांचे ते वडील तर अंबिका दासरी यांचे पती होत.

### श्रीमती नलिनीबाई सुपेकर यांचे दु:खद निधन



नगर - वाणीनगर, पाईपलाईन रोड येथील रहिवासी श्रीमती नलिनीबाई जालिंदर सुपेकर (वय ७४) यांचे १४ एप्रिल रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### नवनाथ पवार यांचे हृदयविकाराने निधन



नगर - केडगाव मोहिनीनगर येथील रहिवासी नवनाथ झुंबर पवार (वय ६०) यांचे १४ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १५ एप्रिल रोजी केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, वडील, २ मुले, १ मुलगी, जावई असा परिवार आहे.

### आनंदराव काकडे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - तालुक्यातील जेऊर बायजाबाई येथील रहिवासी आनंदराव बाबुराव काकडे (वय ६५) यांचे हृदयविकाराने निधन झाले. जेऊर येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अण्णा या नावाने ते सर्वांना परिचित होते. एस.टी. महामंडळाचे तारकपूर आगाराचे कंडक्टर कैलास काकडे यांचे ते वडील होत.

### रुख्मिणी मुसमाडे यांचे वृद्धापकाळाने निधन



श्रीरामपूर -येथील रुख्मिणी रायभान मुसमाडे (वय ९५) यांचे १४ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भानुदास मुसमाडे यांच्या मातोश्री, देविदास व रामदास मुसमाडे यांच्या चुलती, राहुल व रोहित मुसमाडे यांच्या आजी होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## जातिव्यवस्था निर्मूलनासाठी शिक्षणात आमूलाग्र बदल करा

### आंबेडकर जयंतीनिमित्त ‘रिकॉन्शिओ शिक्षण’ लागू करण्यासाठीची हाक

नगर - जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, स्त्री दास्य व भोंदूगिरी, मतदास्य यांचे समाजातून कायमस्वरूपी उच्चाटन करण्यासाठी शिक्षणपद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची मागणी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने करण्यात आली आहे. इयत्ता ४ थी ते १२ वीच्या शिक्षणात ‘रिकॉन्शिओ शासनाद्वारे अजनुकीय माहिती सुधारणा’ हा विषय अनिवार्य करण्यासाठी राष्ट्रव्यापी स्तरावर ही मागणी करण्यात आली.

भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा स्मारक येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी जात व धर्म हटाव, देश बचाव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हुतात्मा स्मारक येथे हा कार्यक्रम पार पडला. यावेळी जात व धर्म हटाव, देश बचाव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

या वेळी ॲड. कारभारी गवळी, ॲड. अमित थोरात, ॲड. लक्ष्मण पोकळे, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, प्रकाश गोसावी, प्रतीक म्हस्के, वीर बहादुर प्रजापती, पोपट भोसले, अशोक भोसले, रमा आढाव, आनंदा आढाव, संजय शेकडे, शाहीर कान्हू सुंबे, बाजीराव गव्हाणे, लखन साळवे आदी उपस्थित होते.

संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, जातिव्यवस्था ही सुमारे २५०० वर्षांपासून भारतीय समाजात खोलवर रुजलेली आहे. तिचे उच्चाटन करण्यासाठी केवळ कायदे पुरेसे नसून दीर्घकालीन, शास्त्रशुद्ध व सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. इयत्ता ४ थी ते १२ वी हा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाचा सुवर्णकाळ असून, या टप्प्यावर ‘रिकॉन्शिओ शिक्षण’ दिल्यास पुढील पिढीला जातिव्यवस्था व अंधश्रद्धेपासून मुक्त करता येऊ शकते, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

ॲड. कारभारी गवळी म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला संविधान दिले आणि जाती निर्मूलनाचा स्पष्ट मार्ग दाखवला. मात्र संविधानाची अंमलबजावणी होऊनही जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, भोंदूगिरी, दैववाद, स्त्रीदास्य आणि मतदास्य या सामाजिक व्याधी आजही समाजात जिवंत आहेत. याचे मूळ कारण म्हणजे माणसाच्या मेंदूत खोलवर रुजलेली अजनुकीय माहिती. कायदा माणसाचे वर्तन बदलू शकतो, परंतु मनातील संस्कार बदलण्यासाठी शिक्षणपद्धतीत बदल करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे ‘रिकॉन्शिओ शासन’ आणि समन्वित ज्ञान सिद्धांत यांचा आधार घेऊन शिक्षणात क्रांतिकारी बदल घडवणे गरजेचे आहे.

जातिव्यवस्था व अंधश्रद्धा या ‘केंद्राभिमुख भावना’ जसे की भय, कल्पनानिष्ठा, जातीय अहंकार आणि आंधळी आज्ञाधारकता यांमुळे टिकून आहेत. याउलट, ‘केंद्रापसारक भावना’ विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवी प्रतिष्ठा आणि स्वतंत्र विचार यांचा विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे. ‘समज, तपास आणि सुधारणा’ हे त्रिसूत्र शिक्षणाचे मूलतत्त्व असले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रकाश थोरात म्हणाले की, आज समाजात अजूनही जातीय भेदभाव आणि अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येते. या समस्येवर केवळ कायद्याच्या माध्यमातून उपाय होणार नाही, तर शिक्षणातून मानसिकता बदलणे आवश्यक आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समता आणि मानवी मूल्ये रुजवली गेली, तर भविष्यात समाज अधिक समतावादी व प्रगत होईल. ‘रिकॉन्शिओ शिक्षण’ ही संकल्पना या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

अशोक सब्बन म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या समतेच्या विचारांचा स्वीकार केल्याशिवाय समाजाचा खरा विकास होऊ शकत नाही. आजही अनेक ठिकाणी अंधश्रद्धा व भोंदूगिरीमुळे सामान्य माणूस दिशाभूल होत आहे. यावर प्रभावी उपाय म्हणजे शिक्षणातून विवेक निर्माण करणे. ‘रिकॉन्शिओ शिक्षण’ विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता वाढवेल आणि अंधानुकरणापासून दूर ठेवेल. त्यामुळे भविष्यात एक सुजाण, विवेकी आणि समताधिष्ठित समाज घडवणे शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

## सोने-चांदीच्या दरात सलग दुसऱ्या दिवशी झाली वाढ

दिल्ली - इराण आणि अमेरिका यांच्यातील ‘शांती चर्चा’ सुरू राहण्याच्या शक्यतेनेही सकारात्मक भावनांना बळ दिले आहे. मध्यपूर्वेतील तणाव कमी झाल्यामुळे महागाईचा दबाव कमी होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे व्याजदरात कपातीच्या अपेक्षांना आणखी चालना मिळेल आणि सोने व चांदीच्या किमतींबाबतची भावना सुधारण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, १५ एप्रिल रोजी सलग दुसऱ्या दिवशी सोने-चांदीच्या दरात वाढ नोंदवली गेली आहे.

जागतिक बाजारातील घडामोडी आणि अमेरिका-इराण युद्धविरामाच्या आशांमुळे सोन्याला चालना मिळाली. १५ एप्रिल रोजी, अमेरिका आणि इराण यांच्यात पुढील फेरीची चर्चा होण्याचे परिणाम बाजारात दिसत आहेत. १५ एप्रिल रोजी, सराफा बाजार उघडताच सोन्याचे भाव जवळपास १,५४,८०० रुपयांवर पोहोचले तर, चांदीच्या दरात २,३०० रुपयांची वाढ होऊन २,५५,०६० रुपये किलोवर उसळी घेतली आहे. अशाप्रकारे, २८ फेब्रुवारी २०२६ पासून अमेरिका आणि इस्रायलच्या इराणसोबतच्या युद्धामुळे सोन्याचे जे मोठे नुकसान झाले होते, त्याची अलीकडच्या काळात पुन्हा एकदा भरपाई झाल्याचं पाहायला मिळत आहे.

## अहिल्यानगर येथील ‘ए.एच.पोखरणा ज्वेलर्स’च्यावतीने सोने चांदी दागिने खरेदीवर ई बाईक जिंकण्याची संधी

### जितके सोने खरेदी तितकी चांदी मोफत, अक्षय तृतीया व वर्धापनदिन दिनानिमित्त ग्राहकांना खास भेट

नगर - अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तानिमित्त तसेच २० व्या वर्धापनदिनानिमित्त ए.एच. पोखरणा ज्वेलर्सच्या स्टेशन रोड सथ्था कॉलनी तसेच सर्जेपुरा येथील दालनात सोने खरेदीवर ऑफर देण्यात आली आहे. १५ ते ३० एप्रिल या कालावधीत सोने चांदीचे दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना इ बाईक जिंकण्याची संधी मिळणार आहे. तसेच जितक्या वजनाचे सोने खरेदी तितक्या वजनाची चांदी मोफत मिळणार आहे, अशी माहिती अमित पोखरणा व आकाश पोखरणा यांनी दिली.

ज्वेलर्सचा वर्धापनदिनही या योजने द्वारे साजरा केला जात आहे. आकर्षक कलाकुसर, डिझाईन बरोबरच ग्राहक वर्ग शुध्दता व विश्वसनीयतेला महत्व देतात. मागील दोन दशकांपासून सुवर्ण व्यवसायात असलेल्या ज्वेलर्सने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर संस्मरणीय भेट दिली आहे.

अनिल पोखरणा यांनी सांगितले की, मागील



अमित पोखरणा



आकाश पोखरणा

२० वर्षांपासून सुवर्ण सेवा देताना दालनाने नेहमीच ग्राहकांना त्यांच्या विश्वासाचा परतावा देण्याचा प्रयत्न केला आहे. विविधे सण उत्सवावेळी देण्यात आलेल्या सवलत योजनांचा ग्राहकांना लाभ होतो. आताही ग्राहकांना संस्मरणीय भेट देण्याचे ठरवले आहे. त्यामुळे मनपसंत दागिने खरेदी व सवलत असा दुहेरी लाभ होणार आहे. याशिवाय येथे सर्वात कमी मजुरी दर आकारण्यात येतात.

याठिकाणी नववधूसाठीच्या ब्रायडल दागिन्यांचेही खास कलेक्शन उपलब्ध आहे. सध्याच्या काळात कमी वजनाच्या नाजूक कलाकुसरीच्या दागिन्यांचा ट्रेंड आहे. त्यानुसार कमी वजनाचे प्रत्येकाला भावतील असे दागिने या दालनात आहेत. याशिवाय टेंपल ज्वेलरी, इटालियन, अँटिक ज्वेलरीही उपलब्ध आहे. सर्व दागिने हॉलमार्क प्रणितच असून सोने (दागिने) मोडताना कुठल्याही प्रकारची घट कापली जात नाही. दागिन्यांची मोठी व्हरायटी ज्वेलर्सचे वैशिष्ट्ये असून मंगळसूत्र, नेकलेस, राणीहार, बांगड्या, कर्णफुले, बाजूबंद, सोन्याचे घड्याळ, चेन, ब्रासलेट, अंगठी, ठुशी, टेंपल ज्वेलरी, डायमंड नेकलेस, अँटीक ज्वेलरीची खास व्हरायटी येथे आहे. या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन ज्वेलर्सच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: सर्जेपुरा शाखा: ८३५३०५०५०५, सथ्था कॉलनी: ८००७००५००१.

# गृहिणी

## आरोग्य

### एसीमध्ये राहत असाल तर...

उन्हाळा सुरू झाल्याने लोकांनी एअर कंडिशनरचा वापर वाढवला आहे. एअर कंडिशनिंगमुळे जीवन आरामदायक होते आणि उष्णतेपासून आराम मिळतो, परंतु एअर कंडिशनरच्या सततच्या संपर्कात राहण्याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात.एसीचे तापमान खूप कमी ठेवल्याने शरीरात विविध समस्या उद्भवू शकतात. एसीमधील थंड, कोरडी हवा त्वचा आणि केसांमधील नैसर्गिक ओलावा कमी करते. यामुळे त्वचा कोरडी आणि खरखरीत होऊ शकते. केस देखील कोरडे पडू शकतात, तुटू शकतात आणि टाळूला खाज येऊ शकते. एसीच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने त्वचेतील ओलावा आणि नैसर्गिक तेल कमी होऊन कोरडेपणा वाढू शकतो. एसीमधून सतत येणाऱ्या थंड हवेचा घशावर आणि फुफ्फुसांवर परिणाम होतो. यामुळे खोकला, सर्दी, घसादुखी यांसारख्या समस्या वाढू शकतात. दमा किंवा श्वसनाच्या आजारांनी त्रस्त असलेल्यांसाठी हे आणखी हानिकारक ठरू शकते. थंड हवेमुळे स्नायू आणि सांधे आखडू शकतात. एसीमध्ये जास्त वेळ राहिल्याने स्नायूंवर ताण येऊ शकतो, वेदना होऊ शकतात आणि सांधे आखडू शकतात.

## पाककला

### सफरचंद चटणी

**साहित्य** : सफरचंद २ मध्यम आकाराचे (किसलेले किंवा बारीक चिरलेले) गूळ किंवा साखर अर्धी वाटी (सफरचंदाच्या आंबटपणानुसार कमी-जास्त करा), लाल तिखट १ छोटा चमचा, जिरे पूड अर्धा चमचा, चाट मसाला किंवा आमचूर पावडर अर्धा चमचा, मीठ चवीनुसार (किंवा थोडे काळं मीठ), तेल १ मोठा चमचा, मोहरी व जिरे फोडणीसाठी, दालचिनीचा छोटा तुकडा (ऐच्छिक, छान स्वाद येतो)

**कृती** : सफरचंद स्वच्छ धुवून, त्याची साल काढून घ्या आणि किसणीने किसून घ्या किंवा अगदी बारीक तुकडे करा. एका कढईत तेल गरम करून त्यात मोहरी, जिरे आणि दालचिनीचा तुकडा टाका. फोडणीत सफरचंदाचा कीस टाकून २-३ मिनिटे परतून घ्या. त्यावर झाकण ठेवून सफरचंद थोडे मऊ होऊ द्या. सफरचंद मऊ झाले की त्यात गूळ/साखर, लाल तिखट, जिरे पूड, चाट मसाला आणि मीठ टाका. गूळ विरघळल्यावर चटणीला पाणी सुटेल. हे मिश्रण घट्ट होईपर्यंत आणि सफरचंद पूर्णपणे शिजून काचेसारखे पारदर्शक दिसेपर्यंत मंद आचेवर शिजवा चटणीला छान चकाकी आली की गॅस बंद करा. थंड झाल्यावर ही चटणी अधिक घट्ट होते.

## वास्तू

### ग्राहक आकर्षिक करण्यासाठी

* नवीन आर्थिक संधी आणि ग्राहक आकर्षित करण्यासाठी, हिरवीगार पाने असलेले मनी प्लांट निळ्या काचेच्या बाटलीत ठेवून उत्तर दिशेला ठेवा.
* घरात पैशाचा सुरळीत प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी आग्नेय दिशेला लाल किंवा तांब्याचे स्वस्तिक लावा.
* गुरुंचा आशीर्वाद मिळवण्यासाठी त्यांचे चित्र पश्चिम दिशेला ठेवा.

## सौंदर्य

शिजवलेला भात वाटून त्याची पेस्ट बनवा आणि त्वचा उजळण्यासाठी, हलक्या एक्सफोलिएशनसाठी व दाह कमी करण्यासाठी लावा. फेस योगा करा. रक्तसंचारामुळे त्वचा आणि केसांवर चांगला परिणाम होतो.

## सल्ला

चेहऱ्यावर मास्क लावण्यापूर्वी वाफ घ्या. त्यामुळे चेहरा चांगल्या प्रकारे स्वच्छ होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १६ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, उ.भा.१३।५९, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.

**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

## शब्दगंध क्र. ७४१० सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द** - १) गजवदन; गणपती ४) तृप्ती; समाधान; सुख ७) जाहीर किंवा प्रसिद्ध करणे (पुस्तक वगैरेचे) ८) दुराग्रही; हट्टी ९) टिकाव १०) उसण; सणक; तेज; लकाकी १२) स्त्रियांचे एक वस्त्र १४) वाईट सवय; खोड १५) गणनायक; धरित्री; रसा; पृथ्वी १८) जरब; दरारा; वचक १९) भांडण सोडविणारे त्रयस्थ मंडळ २०) कुंपणाचा मोठा दरवाजा २१) रक्तवाहिनी; धमनी; शीर; नाडी २२) बिहारमधील हिंदू व बौद्ध धर्माचे एक तीर्थक्षेत्र २३) पायाची खोट; जत्ती

**उभे शब्द** - २) संकट; बलामत; अरिष्ट; विपत्ती ३) क्रिकेटमध्ये सहा चेंडूंचा समूह ४) दीप; दीपक ५) शंभराचा समूह; सेंच्युरी ६) नगरपालिकेवरील लोकप्रतिनिधी ९) हालचाल ११) लक्ष्मीपती; विष्णू १३) वाढ; वृद्धी; विकास १६) सुगंध; सौरभ १७) षडरिपूंपैकी एक; माज; कैफ; नशा १८) लहान; छोटा; सान २०) अत्तराचा बोळा

### शब्दगंध क्र. ७४०९ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : तू चिमुटभर देत असताना मी ओंजळ पुढे केली ते हव्यास म्हणून नव्हे, तर कणभरही सांडू नये म्हणून होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### समुद्राच्या लाटा नेहमीच किनाऱ्याकडे येतात त्याच्या विरुद्ध दिशेला का नाही जात?

समुद्राच्या लाटा कशाही असो त्या दरवेळी किनाऱ्याकडे येतात ही आपली एक कल्पना आहे कारण की आपण किनाऱ्यावर बसून त्यांना बघतो. लाटा निर्माण होण्याचे मुख्य कारण असते वारा आणि दुसरे कारण जे काही वेळा महत्त्वाची ठरतात ती म्हणजे गुरुत्वाकर्षण सूर्य आणि चंद्र यांचे आणि तिसरे कारण म्हणजे पृथ्वीचे आपल्या आसा भोवती गोल फिरणे अर्थात कोणत्याही वेळेला तुम्ही पश्चिमेकडची भाग पूर्वेकडे जात असतो म्हणून आपल्याला सकाळी सूर्योदय होताना दिसतो पूर्वे कडून.

याचा दुसरा परिणाम हा कि लाटा दरवेळी पश्चिमेकडून पूर्वेकडे जायला हव्या अर्थात जर तुम्ही पश्चिम किनाऱ्यावर बसले असाल जमिनीच्या जसे मुंबईला असताना तर पृथ्वीच्या आपल्या असाभोवती गोल घुमण्याचा परिणाम लाटा समुद्राकडून जमिनीकडे येताना दिसतील परंतु दर वेळा असे होत नाही.

जर आपण मद्रास किंवा विशाखापटनमच्या किनाऱ्यावर जाऊन बसलो तर त्या न्यायाने लाटा आपल्यापासून दूर समुद्रात जायला हव्या परंतु तसे होत नाही. तिथेही आपल्याला लाटा समुद्राकडून आपल्याकडे येताना दिसतात. थोडक्यात पृथ्वीच्या फिरण्यामुळे लाटा निर्माण कमी होतात पण समुद्राची उंची वाढते.

समुद्राचे पाणी रात्री आणि दिवसा जमिनीवर असलेल्या तापमानापेक्षा कमी किंवा जास्ती होते आणि त्यामुळे वेळी समुद्राकडून पृथ्वीकडे आणि पृथ्वी कडून समुद्राकडे वाऱ्याची दिशा असते ही दिशा मुख्यत्वे करून समुद्राकडून पृथ्वीकडे किंवा पृथ्वी कडून समुद्राकडे बदलत असते कारण की तापमान पाण्याचे आणि जमिनीवर यातील बदल होत असतो आणि त्यामुळे ते बदलते तो होण्याचे कारण कित्येक वेळा दिवसात सूर्यप्रकाशामुळे जमीन तापते.

मासे मारणाऱ्या लोकांना एक प्रकारचे पंचांग किंवा लाटांचे पंचांग असते त्यानुसार त्यांना माहित असते की इतका वेळ भरती राहील मग ओहटी सुरू होईल आणि ती केव्हा सुरू होईल आणि केव्हा बंद होईल याचे नियम ठरलेले असतात ते समुद्रात सूर्य आणि चंद्र यांच्या गुरुत्वाकर्षणात यामुळे निर्माण होतात आणि अमावस्या पौर्णिमा नसली तरी समुद्र थोडा प्रमाणात वर खाली होतो कारण की पृथ्वी फिरत असल्याने सूर्य चंद्र एका दिशेला येऊ शकतात काही प्रमाणात आणि त्यामुळे भरती ओहोटी होत असते.

समुद्राचे पाणी आणि लाटा किनाऱ्या कडेच येतात असे नसून दोन्ही दिशांना जातात हवेच्या दिशेनुसार याला थोडी मदत भरती ओहोटी च्या मुळे पण मिळते पण वाऱ्याची दिशा ही तापमाना मुळे बदलते.

### गवताचा रंग

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एकदा हत्ती आणि गाढव जंगलातील हिरव्यागार शेतात फिरत होते. गवत चरत असताना गाढव म्हणाला, हत्ती दादा! या निळ्या गवताची चव काही वेगळीच आहे. तू काय म्हणालास? निळे गवत?, हत्ती आश्चर्याने विचारले.

हो, या निळ्या गवताची चव खूप चांगली आहे., गाढव आत्मविश्वासाने म्हणाला.

तू किती मूर्ख आहे, हे गवत हिरवे आहे, निळे नाही, हत्तीने त्याची थट्टा करत म्हटले.

यावर गाढव रागाने म्हणाला, अरे दादा! तुझा मेंदूही तुझ्यासारखाच जाड झाला आहे, तुला हा निळा रंग दिसत नाही. गवताच्या रंगावरून दोघांमध्ये वाद वाढला, दोघेही एकमेकांना मारण्यास तयार झाले. शेवटी असे ठरले की त्यांनी जंगलाचा राजा सिंहाकडे जावे आणि तोच ठरवेल की कोण बरोबर आहे आणि कोण चूक.

गाढव आणि हत्ती आणि सिंहाजवळ पोहोचले. सिंहाला पाहून गाढवाने मोठ्याने म्हटले, महाराज, कृपया या मूर्खाला सांगा की गवताचा रंग हिरवा नाही तर निळा आहे. सिंह म्हणाला, हो, तुम्ही अगदी बरोबर आहात. गवताचा रंग निळा आहे.

गाढवाने हसून हत्तीकडे बोट दाखवले आणि म्हणाला, या मूर्खाला शिक्षा करा, जेणेकरून तो भविष्यात अशी चूक करू नये.

सिंह म्हणाला, आम्ही हत्तीला एक महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा देतो. हत्ती अवाक झाला. गाढव गेल्यानंतर तो म्हणाला, महाराज, कृपया मला माफ करा, पण मी गवताचा रंग हिरवा असल्याचे सांगून कोणतीही चूक केली नाही. मग ही शिक्षा?

सिंह म्हणाला, तुम्हाला गवताच्या रंगामुळे शिक्षा होत नाहीये. तुम्हाला शिक्षा होत आहे कारण एवढा बुद्धिमान प्राणी असूनही, तुम्ही गाढवासारख्या मूर्ख प्राण्याशी वाद का घातलात आणि शिवाय, तुम्ही माझ्याकडे ही समस्या सोडवण्यासाठी आलात आणि माझा वेळही वाया घालवला. म्हणूनच तुम्हाला शिक्षा होत आहे.

तात्पर्य : आपण कधीही निरुपयोगी वादात पडून आपला वेळ वाया घालवू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



### नाम मन और शरीर

सही समझ का सार यह है कि जीवन में जो कुछ भी घटे, उससे संतुष्ट रहो, क्योंकि वह सदा दिव्य दया से सुगंधित होता है और हमारे आध्यात्मिक उत्थान के लिए होता है। आध्यात्मिक शिष्य ऐसे उच्च विवेक का आनंद उठाते हैं। परिस्थिति का बहादुरी से सामना करने का आपका रुख आपको अवश्य ही आंतरिक शांति और सौहार्द से धन्य कर देगा।

सत्गुरु के प्रति प्रेम विकसित करने वाले दौर में ऐसे मौके भी आएँगे, जब हम अपनी सीमित बुद्धि के आधार पर, सत्गुरु के निर्देशों की वैधता पर शक करते हैं।

पर ऐसे मौके केवल परीक्षाएँ हैं, हमारे आत्म समर्पण को अधिक पक्का और पूर्ण बनाने के लिए और जो इन परीक्षाओं में सफल हो जाता है, वह एक दिन प्रभु के १ से चमक उठेगा

३४. 'नाम' मन और शरीर को संतुलन की हालत में रखता है । भक्त के हृदय में शांति राज करती है और मन के सारे बंधन सदा के लिए टूट जाते हैं। सभी लालसाओं की मन पर पकड़ खत्म हो जाती है और बुद्धि को शांत करने वाली दवाई मिल जाती है। 'नाम' बेकार की हड़बड़ाहट को खत्म कर देता है और इसके साथ सभी मानसिक तनाव, बेचैनी और दबाव भी गायब हो जाते हैं नाम हमें सभी प्रकार के शारीरिक और सांसारिक दुख, दर्द और परेशानियों से बचा लेता है। अपने ध्यान को अंतर्मुख करने से, मन शांत हो जाता है और आत्मा सभी मानसिक दुविधाओं से मुक्त हो जाती है । सभी प्रकार का अहंकार शून्य हो जाता है गुरु के प्रति प्रेम और उसकी दिव्य इच्छा के प्रति पूर्ण समर्पण सदा ही सभी संतों-महात्माओं की शिक्षा रही है, खासकर संतमत की । एक शिष्य और एक नामलेवा के रूप में आपका मुख्य कार्य है, इन गुणों को अधिक से अधिक धारण करना। बाकी सब सत्गुरु पर छोड़ दो।

३६. संदेह और शंका के क्षण भी जरूर आएँगे, पर अगर आप उनमें से अडिग प्रेम और विश्वास के साथ गुजर जाएँगे, तो आप पाएँगे कि अंतर का रूहानी रास्ता आपके लिए खुलता जा रहा है और आप हर वस्तु को पाते जा रहे हैं।

(क्रमश)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

समजवावं लागेल. आपल्याबद्दलच्या आपल्या आवडीचे रंग वापरून आपलं चित्र आपल्याला बदलायचं आहे हे नेहमी लक्षात ठेवा. हे बदल घडवून आणण्यासाठी आपल्याला शक्तिशाली ऊर्जेची गरज आहे. स्वतःच स्वतःचं समुपदेशन केल्याने आत्म्याची शक्ती वाढते आणि भविष्यात सगळं काही बरोबर करण्याच्या योग्यतेचं बनवते. ह्याउलट, स्वतःवर टीका केल्याने आत्म्याची शक्ती कमी होते. अशा प्रकारे बदल घडवणं आणखीनच अवघड होतं आणि जास्त चुका करण्याची शक्यता निर्माण होते. सतत स्वतःवर टीका केल्याने आपण स्वतःत बदल करू शकत नाही.

सुरेश ओबेरॉय : खूपच सुंदर!

शिवानीदीदी : कोणकोणत्या गोष्टींसाठी आपण स्वतःवर टीका करतो त्याची यादी बनवणं हा आपला गृहपाठ आहे. त्यानंतर तटस्थ भूमिकेतून जसं आपण इतरांचं समुपदेशन करू तसं स्वतःचं समुपदेशन करा. स्वतःशी प्रेमाने वागायचं आहे हे आपण लक्षात ठेवलं पाहिजे. आपण स्वतःला जसं वागवतो तीच आपली इतरांशी वागायची पद्धत बनते.

कित्येकदा लोक विचारतात : आपण चूक केली तरीही स्वतःचं कौतुक करायचं का? याचं उत्तर हो असंच आहे. कारण कोणताही बदल घडवून आणण्यासाठी आपल्या आत्म्याची बॅटरी पूर्वीपेक्षा जास्त चार्ज्ड असणं गरजेचं आहे. आणि हे फक्त स्वतःचं कौतुक केल्याने घडू शकतं. स्वतःवर टीका केल्याने आपली शक्ती कमी होईल त्यामुळे कितीही मोठ्ठी चूक केली तरी त्यावर टीका हे उत्तर असू शकत नाही.

सुरेश ओबेरॉय : आत्म-प्रशंसेच्या अभावी आपल्या गाडीत पुरेसं इंधन नसेल तर आपण आत्म-परिवर्तनाच्या मार्गावर पुढे जाऊ शकत नाही म्हणजेच आपण आपल्यात बदल घडवून आणू शकत नाही.

शिवानीदीदी : हो, जितके वेळा आपण आपलं ध्येय गाठण्यात अपयशी ठरू तितकेच आपण मागे पडत जाऊ, हरत जाऊ. आपण व्यथित, दुःखी आहोत आणि आपलं आयुष्य आता असंच घालवायचं आहे असं आपल्याला वाटेल. म्हणून आजपासून, स्वतःवर टीका करायचं थांबवा आणि स्वतःचं मनापासून कौतुक करा. ध्यान आणि चिंतन - मला स्वतःला बघायचं आहे... मी मूळ रुपात एक शुद्ध आणि सुंदर आत्मा आहे... इतरांनी मला माझ्याबद्दल जे सांगितलं ते मी स्वीकारलं... हाच मी आहे असं मला वाटलं... (क्रमश)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

गुरुजी : काय रे बंडु हि कोणाची सही अशी

बंडु : आई चि माझ्या

गुरुजी : अशी सही ?? आई चे नाव काय?

बंडु : जलेबी बाई उझ्र

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* एसीएडीए सिस्टीम कोणी विकसित केली ओह?

– डीआरडीओ

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### चिक्कू

बदामी, तपकिरी रंगाचे व मधुर चवीचे चिकू हे फळ त्याच्या गोड चवीमुळे सर्वांचेच आवडते फळ आहे. नैसर्गिक साखरेचे स्रोत म्हणून चिकू हे फळ देवाने दिलेली देणगीच आहे. इंग्रजीमध्ये 'चिकू', तर शास्त्रीय भाषेत मनिलकारा झपेटा असे म्हणतात. चिकू या फळाचे मूळ स्थान कटिबंधातील वेस्ट इंडीज हे आहे. तेथे हे फळ 'चिकोज पेटी' या नावाने ओळखले जाते. देशभरातील गुजरात, बिहार, बंगाल, उत्तरप्रदेश तर महाराष्ट्रातील पुणे, कोकण, खानदेश, सुरत, ठाणे या ठिकाणी चिकूची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. चिकूची फळे ही गोलाकार आणि लंबगोलाकार अशी दोन प्रकारची असतात. चिकूचा आकार साधारणतः दोन ते अडीच इंच व्यासाचा असतो. लंबगोलाकार चिकू हे मधुर व स्वादपूर्ण असतात. चिकूमध्ये तीन ते पाच काळ्या चमकदार बिया असतात. चिकूच्या आत मधुर चवीचा, पिवळसर तपकिरी रंगाचा मऊ रसदार गर असतो.

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार : चिकू हे मधुर गणात्मक, शीतल, दाहशामक, पित्तशामक, तृष्णाशामक, श्रमहारक, तृप्तीदायक आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : चिकूमध्ये लोह, फॉस्फरस, कॅल्शिअम, पिष्टमय पदार्थ, प्रथिने, मेद व आर्द्रता भरपूर प्रमाणात असतात. तसेच 'अ' जीवनसत्त्व जास्त प्रमाणात असून, 'क' जीवनसत्त्व थोड्या प्रमाणात असते. चिकूमध्ये नैसर्गिक फलशर्करा भरपूर प्रमाणात असते. चिकूमध्ये असणाऱ्या या गुणधर्मामुळे थकलेल्या, दमलेल्या, अशक्त झालेल्या निरुत्साही व्यक्तीस चिकूचे सेवन हे अमृतासमान आहे.

उपयोग : १) लहान बालकांना अभ्यास व खेळण्यामुळे शारीरिक व मानसिक थकवा आल्यानंतर चिकू खायला दिल्याने त्यांच्यामध्ये नवीन उत्साह व शक्ती संचारते. त्यामध्ये फलशर्करेचे प्रमाण अधिक असल्याने ती रक्तात मिसळून लगेचच थकवा घालवते.

**(क्रमश)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# नऊ किलोमीटर दंडवत यात्रा!



'लग्न म्हणजे सात जन्मांचे बंधन', असे म्हटले जाते. आयुष्यभर एकमेकांसोबत राहण्याच्या, सुख-दुःखात साथ देण्याच्या शपथा घेतल्या जातात; मात्र बदलत्या काळात नात्यांची व्याख्याच बदलताना दिसत आहे. कधी प्रेम, कधी वाद आणि कधी परिस्थिती इतकी टोकाची होते, की एकत्र राहणेच कठीण होते. उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात घडलेली एक घटना या बदलत्या नातेसंबंधांवर प्रकाश टाकते.

या प्रकरणात एका तरुणाने पत्नीपासून सुटका मिळावी, म्हणून देवाकडे मन्नत मागितली. ही मन्नत पूर्ण झाल्यानंतर त्याने जे केले त्यामुळे ही कथा संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय ठरली आहे. सोनहा परिसरातील एका गावातील या तरुणाचे वैवाहिक जीवन लग्नानंतर अवघ्या दोन वर्षांतच वादांनी व्यापले गेले. सततचे भांडण आणि मानसिक तणाव यामुळे तो त्रस्त झाला होता. अखेर त्याने स्थानिक देवीच्या मंदिरात जाऊन पत्नीपासून सुटका मिळाली तर मी दंडवत यात्रा करीन, असा नवस बोलला.

पत्नीपासून वेगळे होण्यासाठी त्या तरुणाने न्यायालयाचा मार्ग निवडला. जवळपास दोन वर्षे हा खटला चालला आणि अखेर त्याला घटस्फोट मिळाला. या निर्णयानंतर तो आणि त्याचे कुटुंबीय आनंदी झाले. कारण दीर्घकाळ चाललेला तणाव संपला होता. सामान्यतः घटस्फोट ही दुःखद घटना मानली जाते; पण येथे ती एका प्रकारची 'मुक्ती' म्हणून साजरी होताना दिसली. नवस पूर्ण झाल्यानंतर त्या तरुणाने आपले वचन पाळले. त्याने गावापासून भानपूर येथील मंदिरापर्यंत सुमारे ९ किलोमीटरची दंडवत यात्रा केली. विशेष म्हणजे ही यात्रा त्याने उपाशीपोटी आणि पूर्ण श्रद्धेने केली.

ही यात्रा शारीरिकदृष्ट्या अत्यंत कठीण होती. प्रत्येक पावलागणिक शरीरावर ताण वाढत होता; पण त्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. जणू काही तो एका नव्या आयुष्याच्या दिशेने चालला होता. या यात्रेतील सर्वात वेगळी गोष्ट म्हणजे तो एकटा नव्हता. त्याचे आई-वडील आणि गावातील अनेक लोक वाजत गाजत, जयघोष करत त्याच्या मागे चालत होते. नाते तुटल्यावर सहानुभूती व्यक्त केली जाते. परंतु येथे उत्सवाचे वातावरण होते. हे दृश्य समाजातील बदलत्या मानसिकतेचे प्रतीक मानले जाऊ शकते.

# कॅलिडोस्कोप

## सोने आले स्फोटातून!



सोने नेहमीच मौल्यवान आणि चमकदार धातू म्हणून ओळखले जाते; पण हे सोने पृथ्वीवर कुठून आले असेल? वैज्ञानिकांनी आता हे रहस्य उघड केले आहे. ते आपल्या हातातील अंगठी किंवा गळ्यातील हारातील सोने खरे तर अब्जावधी वर्षांपूर्वी अंतराळातील भयंकर स्फोटांमुळे तयार झाले आहे. 'द ॲस्ट्रोफिजिकल जर्नल लेटर्स'मध्ये प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, सोने कोणत्याही जादूने नव्हे, तर 'मृत ताऱ्यांच्या धडके'तून निर्माण झाले. म्हणजे सोने 'मेड इन अर्थ' नाही, तर 'मेड इन स्पेस' आहे.

सोने सामान्य धातूंसारखे सहज तयार होत नाही. यासाठी ब्रह्मांडात 'महा-विस्फोट' व्हावा लागतो. दोन अतिशय घन न्यूट्रॉन तारे एकमेकांना धडकले तेव्हा 'किलोनोवा' नावाचा भयानक स्फोट झाला. या एका सेकंदात इतकी प्रचंड ऊर्जा निर्माण झाली की त्यातून सोने, प्लॅटिनमसारखी जड मूलद्रव्ये तयार झाली. याशिवाय एखादा प्रचंड तारा आपले लाइफ सर्कल पूर्ण करून फुटतो (सुपरनोवा) तेव्हाही त्याच्या ढिगाऱ्यात सोन्याचे कण तयार होतात. हे अंतराळातील सर्वात मोठे 'सोन्याचे कारखाने' आहेत. सुमारे ४ अब्ज वर्षांपूर्वी पृथ्वी तयार होत असताना अंतराळातून उल्कापिंडांचा (मेटिओराइट्स) प्रचंड पाऊस पडला. या उल्कापिंडांमध्ये अंतराळात तयार झालेले सोने होते. त्या वेळी पृथ्वी आगीचा गोळा होती. त्यामुळे बहुतेक सोने पृथ्वीच्या केंद्रात (कोर) बुडाले. नंतरच्या उल्कापिंडांच्या हल्ल्यांमुळे काही सोने पृष्ठभागावर (क्रस्ट) पसरले. आज आपण खाणीतून हेच सोने काढतो. म्हणजे सोने खरे तर 'अंतराळातील देणगी' आहे! सोन्याचे कारखाने अजून बंद झालेले नाहीत. आजही कुठेतरी अंतराळात न्यूट्रॉन ताऱ्यांच्याधडका होत आहेत आणि प्रचंड सोने तयार करत आहेत, असे वैज्ञानिक सांगतात.

# शेतकऱ्याने घेतले हेलिकॉप्टर



जगाचा पोशिंदा म्हणजे शेतकरी. शेतात घाम गाळून जगाचं पोट भरणारा शेतकरी मोठं कष्ट घेवूनही तसा तितका श्रीमंत होत नाही. उत्तर प्रदेशातील शेतकरी मात्र शेतात न राबता अचानक अफाट श्रीमंत झाला आहे. एका योजनेमुळे त्याचे नशीब पालटले. इतका पैसा आला, की त्याने थेट हेलिकॉप्टर विकत घेतले. तो थायलंडला फिरायला गेला. त्याच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या.

विकास प्रकल्पांचा फायदा केवळ सरकारलाच होत नाही, तर ते संपूर्ण परिसराच्या अर्थव्यवस्थेत परिवर्तन घडवतात. नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ हे याचे उत्तम उदाहरण आहे. ग्रेटर नोएडातील जेवर येथे बांधलेल्या या विमानतळाने परिसरातील लोकांचे आणि शेतकऱ्यांचे जीवन बदलून टाकले आहे. जेवर परिसरात मोठे विकास प्रकल्प सुरू आहेत. यामुळे स्थानिक लोक व्यवसायाशी जोडले गेले आहेत. शिवम प्रजापती (वय २६) हे त्यापैकीच एक आहेत. शिवम पश्चिम उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडातील बनवारी बस गावाचे रहिवासी आहेत. विमानतळाने त्यांचे जीवन बदलून टाकले आहे. विमानतळासाठी त्यांची जमीन संपादित करण्यात आली होती. त्यांना सरकारकडून नुकसान भरपाई म्हणून १५ कोटी रुपये मिळाले. या पैशांनी शिवम यांचे जीवन पूर्णपणे बदलून टाकले आहे. भरपाई मिळाल्यानंतर त्यांनी एक हेलिकॉप्टर खरेदी केले आणि थायलंडच्या सहलीची योजना आखली. अचानक मिळालेल्या पैशातून अपूर्ण इच्छा पूर्ण केल्या. नुकसान भरपाईच्या रकमेने जीवनमान जवळजवळ रातोरात बदलून गेले असे त्यांनी सांगितले. विमानतळासाठी जमीन दिल्यावर शिवम यांना फक्त नुकसान भरपाई मिळाला नाही, तर त्यांना नवा रोजगारही मिळाला. विमानतळ बांधकामातील तेजीमुळे विमानतळ प्रकल्प आणि जवळच्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मजूर पुरवण्याचे काम त्यांना मिळाले. शिवमप्रमाणेच किशोरपूर गावातील अजय बेनिवाल यांच्या उत्पन्नातही या प्रकल्पामुळे वाढ झाली आहे. अजय यांनी आपल्या लहान व्यवसायाचे उत्पन्नाच्या स्थिर स्रोतात रूपांतर केले आहे. एकेकाळी आर्थिक अडचणीत असलेले अजय आता कामावर जाणाऱ्या मजुरांकडून हेल्मेट आणि चाव्या गोळा करण्याची छोटी सेवा चालवून दरमहा सुमारे साठ हजार रुपये कमावत आहेत

# कपडे उतरवले, तरच मिळेल बीचवर एन्ट्री!

समुद्र किनारा सर्वांच्या आकर्षणाचा विषय असतो. जगभरातील लाखो पर्यटक दरवर्षी वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्यांना भेट देत असतात. तेथील लाटांचा आनंद घेताना वातावरणाशी एकरूप होऊन जात असतात. मात्र अनेक समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांसाठी वेगवेगळे नियम आहेत. काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी आपल्या अंगातील कपडे काढू नयेत असा नियम आहे तर काही समुद्र किनाऱ्यांवर पर्यटकांनी अंगातील कपडे काढून समुद्रात अंघोळीचा आनंद घेतला तरी चालत. मात्र जर्मनीमधील काही खास समुद्र किनाऱ्यांना भेटी द्याल तर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसू शकतो. कारण इथे तुम्ही जास्त कपडे घातले असतील तर बाहेरचा रस्ता दाखवला जातो. तुम्हाला बीचवर एन्ट्रीच मिळत नाही. बीचवर जायचे असेल तर आधी सर्व कपडे काढावे लागतात. मगच तिथे प्रवेश मिळतो.

'फर्स्टपोस्ट' च्या एका रिपोर्टनुसार उत्तर जर्मनीच्या काही समुद्र किनाऱ्यांसाठी नवा नियम लागू करण्यात आला आहे. हे समुद्र किनारे निसर्गावर विश्वास ठेवणाऱ्या आणि निसर्गाने आपल्याला दिलेल्या गोष्टींचा मनापासून स्वीकार करणाऱ्या लोकांमध्ये लोकप्रिय आहेत. जर्मनीच्या बाल्टिक समुद्राचा भाग असणाऱ्या रॉस्टॉक समुद्र किनाऱ्यावर एक विचित्र नियम बनवण्यात आला आहे. त्यासाठी रोस्टॉक टूरिझम ऑथोरेटीकडून एक २३ पानांची नियमावलीच तयार करण्यात आली आहे. त्यानुसार तुम्ही कपडे घातलेले असतील तर या समुद्र किनाऱ्यावर एन्ट्री दिली जात नाही.

कपडे घालून समुद्रात अंघोळ करणे किंवा उन्हाचा आनंद घेणे यास या समुद्र किनाऱ्यावर मनाई आहे. हा नियम बनवण्यात आला आहे कारण पूर्वी या समुद्र किनाऱ्यावर काही जण कपडे परिधान करून पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी यायचे तर काही जण कपडे न घालताच समुद्र किनाऱ्यावर यायचे. मात्र कपडे घातलेले लोक विवस्त्र वा तोकडे कपडे घालणाऱ्यांबद्दल तक्रार करायचे. अशा प्रकारच्या तक्रारी वाढल्याने शेवटी आता इथे सर्व पर्यटकांसाठी एकच नियम लागू करण्यात आला आहे.



# बर्फात बसणे भावते



आपल्याला बर्फाचा तुकडा हातात घ्यायलाही नको वाटतं. अशा परिस्थितीत बर्फाने भरलेल्या पेटीत बसणं ही अशक्य कोटीतली बाब म्हणायला हवी. मात्र ऑस्ट्रियातल्या एका माणसाने अशक्य ते शक्य करून दाखवलं आहे. जोसेफ कोएबर्ग असं या माणसाचं नाव. तो ॲथलिट आहे. जोसेफ बर्फाने भरलेल्या पारदर्शक पेटीत जवळपास दोन तास बसला. यामुळे त्याने विश्वविक्रमच केला आहे. ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्नामध्ये हा विक्रम नोंदवण्यात आला होता. जोसेफने बर्फाने भरलेल्या पेटीत दोन तास आठ मिनिटं आणि ४७ सेकंद घालवली. जोसेफ पेटीत बसल्यानंतर त्याच्या खांद्यांपर्यंत बर्फ भरण्यात आला. यावेळी त्याने फक्त स्वीम सूट घातला होता. अशा थंडगार वातावरणात काही सेकंद घालवल्यानंतर हुडहुडी भरू लागते. आपण पार गारठून जातो. मात्र जोसेफ तब्बल दोन तास तिथे होता. या आधी चिनी ॲथलिट जिन सोंगहाओने बर्फात बसण्याचा विक्रम केला होता. त्याचा हा विक्रम जोसेफने मोडला. या पेटीतून बाहेर आल्यानंतर डॉक्टरांनी जोसेफला तपासलं. त्यावेळी तो एकदम तंदुरूस्त होता. एवढा वेळ बर्फात बसून रहाणाऱ्या जोसेफच्या धाडसाचं कौतुक संपूर्ण जगाने केले.

# रेल्वे रुळाची का होत नाही चोरी?



रेल्वे रुळाची चोरी करणे हे ऐकायला सोपं काम वाटतं; पण प्रत्यक्षात हे जवळपास अशक्य काम आहे. त्यामुळे अनेक नामचिन, भुरटे चोर रेल्वे रुळाची चोरी करण्यास धजावत नाहीत. त्यामागे काही मोठी कारणं आहेत. हे रेल्वे रुळ चोरले तरी ते विकणे सोपे काम नाही. त्यामुळे ही जोखीम कोणी घेत नाही. एकतर रेल्वे रुळ हा अत्यंत भरीव आणि वजनदार असतो. इतका वजनदार रुळ कापणे, उचलणे आणि त्याची विक्री करणे हे अत्यंत जोखमीचे कारण आहे. अनेक चोरांना यामुळे अपघात होईल आणि मोठ्या प्रमाणात जीवितहानी होईल या भीतीनेही अनेक जण ही चोरी करण्यास धजावत नाहीत.

रेल्वेचा रुळ हा साध्या लोखंडापासून तयार होत नाही, तर पोलाद, स्टीलचा खास वापर करण्यात येतो. रेल्वे रुळ इतका कठीण असतो, की तो तोडणे आणि कापणे सोपे काम नाही. त्यासाठी एकदम खास मशीन आणि उपकरणांची आवश्यकता असते. ही उपकरणं बाजारात सहज उपलब्ध नसतात. हे रुळ जमिनीला अधिक घट्ट जोडलेले असतात. क्रॉंक्रिट, बोल्ट आणि क्लिपच्या सहाय्याने रुळ एकदम घट्ट जोडलेला असतो. त्याला खिळखिळ करणे सोपे काम नाही.

एखाद्या ठिकाणी क्लिप उखळली असेल, रुळ जमिनीपासून वर आले असतील आणि कदाचित एखाद्याने ते सहज चोरले तरीही भंगारवाले अथवा इतर कोणी हा रुळ खरेदी करत नाही. कारण ही बाब समोर आल्यास भंगारवाल्याचे दिवाळेच निघते. याविषयी कायदे आणि नियम इतके कठीण आहेत, की ही जोखीम मोठे आणि छोटे भंगारवाले घेत नाहीत. रेल्वे रूळाची सातत्याने तपासणी होत असते.



# इथे राहतात हिडिंबेचे वंशज

रामायण आणि महाभारत काळातल्या खुणा आजही पहायला मिळतात. भारतासह इतर काही देशांमध्येही रामायण आणि महाभारत काळाशी संबंधित ठिकाणं आहेत. भीमाने हिडिंबा नामक राक्षसीशी लग्न केल्याचे उल्लेख महाभारतात आहेत. या हिडिंबाचे वंशज आजही अस्तित्वात आहेत. हिडिंबाचे वंशज नागालॅंडमध्ये रहातात. नागालॅंडमध्ये फक्त एकच रेल्वे स्थानक आणि विमानतळ आहे. इथल्या दीमापूर शहराला नागालॅंडचं प्रवेशद्वार म्हटलं जातं. नागालॅंडच्या उत्तरेला अरुणाचल प्रदेश, पश्चिमेला आसाम तर दक्षिणेला मणीपूर आहे. नागालॅंडच्या पूर्वेला म्यानमार आहे. दीमापूरमधल्या महाभारतकालीन वास्तू पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतात. इथे आजही हिडिंबा वाडा आहे. इथे बुद्धिबळाच्या भल्यामोठ्या सोंगट्या पहायला मिळतात. याच सोंगट्यांनी भीम आणि त्याचा पुत्र घटोत्कच बुद्धिबळ खेळत असत असं इथले लोक सांगतात. वनवासादरम्यान पांडवांनी या भागात काही काळ घालवल्याचं म्हटलं जातं. दीमापूर हे एकेकाळी हिडिंबापूर या नावाने ओळखलं जायचं. इथेच भीमाने हिडिंबेशी विवाह केला होता. इथले 'डिमाशा' जमातीचे लोक स्वत:ला हिडिंबाचे वंशज मानतात.

# भन्नाट शक्कल

पुणे तिथे काय उणे म्हणतात ते उगाच नाही. पुणे हे सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने परिपूर्ण शहर असल्याने तिथे सर्व काही उपलब्ध आहे, या अर्थाने पुण्याचे वर्णन करताना ही म्हण वापरली जाते. पुण्यामध्ये शिक्षण, संस्कृती, खाद्यसंस्कृती, आणि निसर्ग या सर्व गोष्टी सहज उपलब्ध होणाऱ्या आणि अगदी हाकेच्या अंतरावर आहेत. पुणे ही पेशव्यांची राजधानी आहे. पुण्याला सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे, पुणे हे नाटकांचे केंद्र आणि विद्येचे माहेरघर मानले जाते. याशिवाय पुणेरी पाटी हे पुणेकरांचे खास वैशिष्ट्य आहे. याच पुण्यात आता एका रिक्षाचालकाची चर्चा होत आहे. भर उन्हात फिरणाऱ्या पुणेकरांना काही क्षणाचा विसावा आणि गारवा मिळवा, यासाठी एका रिक्षाचालकाने भन्नाट शक्कल लढवली आहे. उन्हापासून वाचण्यासाठी रिक्षाचालकाने आपली रिक्षाच पूर्ण हिरव्यागार गवताने सजवली आहे. ती पुणेकरांचे लक्ष वेधून घेत आहे. रिक्षाच्या संपूर्ण छतावर, तसेच आतून-बाहेरून, चहू बाजूने कृत्रिम गवताने सजवलेली आहे. त्यावर काही कृत्रिम फुलांनी सजावट केलेली आहे. त्यामुळे रिक्षाला पूर्णपुणे नवे रुप तर मिळालेच; पण उन्हाच्या झळा काही अंशी कमी करण्याचा प्रयत्नही केला आहे.



# जगातील साठ टक्के लोक होतील लठ्ठ



मुले लहान वयातच लठ्ठपणाने किंवा अनियंत्रित वजनाने ग्रस्त असतील तर त्यांचे आयुष्य कमी होण्याचा धोका वाढतो. लठ्ठपणाच्या तीव्रतेबद्दल एका ताज्या अभ्यासात हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. या अभ्यासानुसार, योग्य ती पावले उचलली गेली नाहीत तर २०५० पर्यंत जगातील सुमारे ६० टक्के प्रौढ आणि एक तृतीयांश मुले अधिक वजनाची असतील किंवा लठ्ठपणाने ग्रस्त असतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

'लॅन्सेट मेडिकल जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनात २०४ देशांमधील विदेचा वापर करून शतकातील सर्वात मोठ्या आरोग्य आव्हानांपैकी एक असणाऱ्या समस्येचे भयानक चित्र रेखाटण्यात आले आहे. हा अभ्यास 'सिएटल इन्स्टिट्यूट फॉर हेल्थ मेट्रिक्स अँड इव्हॅल्युएशन'ने समन्वयित केलेल्या 'ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज' कार्यक्रमांतर्गत केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

**अभ्यासातील महत्त्वाचे मुद्दे**

* जगभरात जास्त वजन असणाऱ्या किंवा लठ्ठ लोकांची संख्या १९९० मध्ये ९२९ दशलक्ष होती ती २०२१ मध्ये २.६ अब्ज झाली आहे.
* पुढील १५ वर्षांत ३.८ अब्ज प्रौढ लोक जास्त वजनाचे किंवा लठ्ठ असतील. याचा अर्थ असा की २०५० मध्ये जगातील एकूण प्रौढ लोकसंख्येपैकी सुमारे ६० टक्के लोक लठ्ठपणाने ग्रस्त असतील.
* यामुळे अर्थातच जगाची आरोग्य व्यवस्था कोलमडेल. जगातील जवळजवळ एक चतुर्थांश लठ्ठ लोकांचे वय ६५ पेक्षा जास्त असेल असा अंदाजही वर्तवण्यात आला आहे.
* आधीच जास्त भार असलेल्या आरोग्य व्यवस्थांवर दबाव वाढला आहे आणि मर्यादित संसाधने असणाऱ्या देशांमध्ये वैद्यकीय सेवांवर त्याचा परिणाम होत आहे.
* लवकरच जगभरातील मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणा १२१ टक्क्यांनी वाढेल.
* २०५० पर्यंत लठ्ठ तरुणांपैकी एक तृतीयांश तरुण उत्तर आफ्रिका आणि मध्य पूर्व, लॅटिन अमेरिका तसेच कॅरिबियन प्रदेशात राहतील.

**आठ देशात सर्वाधिक लठ्ठ**

सध्या, जगातील निम्म्याहून अधिक जास्त वजन असणारे किंवा लठ्ठ प्रौढ लोक फक्त आठ देशांमध्ये राहतात आणि यामध्ये भारताचाही समावेश आहे. चीन, भारत, अमेरिका, ब्राझील, रशिया, मेक्सिको, इंडोनेशिया आणि इजिप्त आणि नायजेरिया असे हे देश आहेत. भारत, पाकिस्तान आणि चीन सारख्या दाट लोकवस्ती असणाऱ्या देशांमध्ये लठ्ठपणा प्रतिबंधाला प्राधान्य दिले पाहिजे.

**मधुमेहाला निमंत्रण**

संशोधकांनी इशारा दिला आहे, की प्रत्येक देशातील मुलांचे वजन मागील पिढ्यांपेक्षा वेगाने वाढत असून लठ्ठ होण्याचे वय कमी होत आहे. त्यामुळे लहान वयातच टाइप २ मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग आणि कर्करोग होण्याचा धोका वाढत आहे. उच्च उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये १९६० च्या दशकात जन्मलेल्या सुमारे सात टक्के पुरुष २५ वर्षांच्या वयापर्यंत लठ्ठ होत होते. परंतु १९९० च्या दशकात जन्मलेल्या पुरुषांसाठी हा आकडा १६ टक्क्यांपर्यंत वाढला आहे आणि २०१५ मध्ये जन्मलेल्या पुरुषांसाठी तो २५ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**लठ्ठपणा कशाला म्हणतात?**

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, लठ्ठपणा हा एक जुनाट आणि गुंतागुंतीचा आजार असून तो जास्त चरबी जमा होण्यामुळे होतो. ही बाब आरोग्याला हानी पोहोचवू शकते. लठ्ठपणामुळे हाडांच्या आरोग्यावर आणि गर्भधारणेवर परिणाम होऊ शकतो. तसेच लठ्ठपणामुळे झोपणे किंवा चालणे यावरही परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, एखाद्या प्रौढ व्यक्तीचा बॉडी मास इंडेक्स (वजन आणि उंचीचे प्रमाण) २५ किंवा त्याहून अधिक असेल तर त्याला जास्त वजन मानले जाते. बॉडी मास इंडेक्स ३० किंवा त्याहून अधिक असेल तर ती व्यक्ती लठ्ठ मानली जाईल.

# युवतींनी आपल्याच धर्मामधील-समाजामधील युवकांशीच विवाह करावा

## राधाकृष्ण महाराज यांचा सल्ला

नगर – युवतींनी आपल्याच धर्मामधील आणि आपल्याच समाजामधील युवकांशीच विवाह करावा, असा सल्ला जोधपूर निवासी राधाकृष्ण महाराजांनी युवतींना दिला.

येथील रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे सहावे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सनातन धर्मसभेचे अध्यक्ष–वेदमूर्ती महेश रेखे, उपाध्यक्ष–हभप निळकंठ देशमुख, विश्वस्त–वेदमूर्ती चकोर मुळे, उमेश वाळुंजकर, सोमनाथ मुळे, समीर उपाध्ये, बंडोपंत धर्माधिकारी, बंडोपंत मुळे, मिलिंद चवंडके आदींच्या हस्ते राधाकृष्ण महाराजांना गौरविण्यात आले.



रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यामध्ये भाविकांची झालेले गर्दी.

राधाकृष्ण महाराज पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील मुलगी आपला पती उत्तम निवडते, हे कौडिण्यपूरच्या रूक्मिणीने पंढरपूरच्या विठ्ठलाशी विवाह करून दाखवून दिले आहे. आजच्या प्रगत युगातील युवतींनी आपल्या मर्यादेत अन् सावध रहावे. आपण चुकीच्या मार्गाने जाणार नाहीत. फसणार नाहीत, याची स्वतःच काळजी घ्यावी. आपला समाज आणि आपल्या धर्माचा अभिमान बाळगावा. परधर्मातील युवकांपासून दूरच रहावे. अलिकडे माता–पिताच मुलीची गांभीर्याने काळजी घेत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

आपल्या परिवारापेक्षा आपला हितचिंतक अन्य कोणीच नसतो. आपले मन आपल्या परिवारातील सदस्यांकडेच मोकळे करावे. इतर सर्वांसाठी आपला विषय मसाला ठरतो, हे ध्यानी घ्यावे. भगवान श्रीकृष्णाचे ८ विवाह झाले होते. भौमासुराच्या बंदीवासातील १६,१०० कन्यांना भगवान श्रीकृष्णांनी सोडवून त्यांच्या पित्याकडे पाठवण्याची व्यवस्था केली. मात्र नातेवाईक आणि समाजातील लोकांच्या टोचून बोलण्याने श्रीकृष्णांनी या सर्वजणींना पत्नीचा सन्मान देत राजभवनात स्थान दिले. १६,१०८ पत्नींना भगवान श्रीकृष्ण कसे सांभाळतात? हे पाहून महर्षी नारद मुनी अत्यंत आश्चर्यचकित झाले होते!

आज किरकोळ घटनेवरून नवविवाहित जोडप्यां मध्ये घटस्फोटाच्या घटना घडतात. चर्चा करताना कोणत्या विषयावर मौन पाळावे? हे कोणीही समजून घेत नाही. घर–परिवार–गल्ली–समाज यामधील स्त्री–पुरूषांमध्ये अप्रियता घडली तर आपलेपणाने एकत्र येऊन एक–दुसऱ्यांना सहाय्य करावे. कोणाच्याही जीवनाची घटना व्हायरल, स्प्राईड, ब्रेकिंग न्यूज, चटपटे समाचार करण्याचे पाप कधीही करू नये. आपण केलेले कर्म कायम आपल्या सोबतच असते, हे कायम लक्षात असू द्यावे.

विवाह सोहळ्यात आपल्या घरातील, आपल्या परिवारातील, आपल्याच नातेवाईकांची उत्तम बडदास्त ठेवूनही ही आपली माणसं काहीतरी चूक काढतातच. आपल्याच घरातील खास लोक रूसतात. मनापासून आनंदी नसल्याचे दिसते. तरीही आपण त्यांच्यासाठी वारेमाप खर्च करतो. आपले कष्ट दुनियेला समजत नाहीत, असे हे कलीयुग आहे.

राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीमधून भागवत कथा श्रवण करताना आणि भजनांसह गीतांचा आनंद घेताना शहराच्या विविध भागातील स्त्री–पुरूष भाविक तल्लीन होत असल्याचे दिसून येते.

# जुन्या वादातून तरुणासह कुटुंबियांना मारहाण, जीवे मारण्याचीही धमकी

नगर – शहरातील पाईपलाईन रोड परिसरातील निर्मलनगर येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका तरुणाला आणि त्याच्या कुटुंबाला बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. 'तुम्ही चौकात जयंती कशी साजरी केली' असा जाब विचारत आरोपींनी अक्षय शहाजी कांबळे या तरुणावर लाकडी दांडक्याने हल्ला केला. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात सोमनाथ गिते, अशोक गिते, दीपक तांदळे आणि एका अनोळखी इसमाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय शहाजी कांबळे (वय २७, रा. निर्मलनगर, पाईपलाईन रोड) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे तपोवन रोडवरील महाराष्ट्र बँकेसमोर असताना आरोपींनी त्यांना अडवले. मागील भांडणाची कुरापत काढून आरोपींनी फिर्यादीच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना अत्यंत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. त्यानंतर आरोपींनी तीन मोटारसायकलवरून येत अक्षय यांना थांबवले आणि सार्वजनिक ठिकाणी जयंती साजरी केल्याचा राग धरून लाकडी दांडक्याने मारहाण सुरू केली. या हल्ल्यात अक्षय यांच्या पाठीवर, खांद्यावर आणि छातीवर गंभीर दुखापत झाली आहे. मारहाणीदरम्यान सोमनाथ गिते याने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. झटापटीत फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चेनही तुटून गहाळ झाली आहे. घटनेनंतर अक्षय कांबळे यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी मारहाण आणि धमकी दिल्याबद्दल गुन्हा नोंदवला आहे.



जैन ओसवाल पतसंस्थेच्या वतीने स्व. सुवालाल गुंदेचा यांच्या ९२ व्या जन्म जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

# स्व. सुवालाल गुंदेचा यांची शिस्तबद्ध कारभाराची शिकवण कायम दिशादर्शक

## अभय पितळे यांचे प्रतिपादन, जैन ओसवाल पतसंस्थेत जयंतीनिमित्त अभिवादन

नगर – सहकाराचा जिल्हा अशी ओळख असलेल्या अहिल्या नगर जिल्ह्यात अनेक दिग्गजांनी सहकाराची पाळेमुळे घट्ट रूजवून मोठे परिवर्तन घडवले. यात सहकार महर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांचे नाव अग्रस्थानी आहे. सहकारी बँकिंगचा गाढा अभ्यास असलेल्या गुंदेचा यांनी सहकारी आर्थिक संस्थांच्यापतस माध्यमातून सर्वसामान्यांना तसेच छोट्या व्यावसायिकांना आर्थिक पत देऊन त्यांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणण्यात योगदान दिले. शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह कारभार करून आर्थिक संस्था उत्तमरीत्या कशी चालवायची हे त्यांनी जैन ओसवाल पतसंस्थेच्या माध्यमातून दाखवून दिले. त्यांनी स्थापन केलेल्या ही पतसंस्था रौप्य महोत्सव साजरा करीत आहे. सुवालालजी गुंदेचा आज हयात नसले तरी त्यांचे विचार आणि आदर्श आजही दिशादर्शक आहेत. त्यामुळेच पतसंस्था कायम प्रगतीच्या राजमार्गावर वाटचाल करीत आहे, असे प्रतिपादन सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे चेअरमन अभय पितळे यांनी केले.

पतसंस्थेच्या वतीने स्व. सुवालाल गुंदेचा यांच्या ९२ व्या जन्म जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी अभय पितळे बोलत होते. याप्रसंगी संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, चेतन भंडारी, शरद गोयल, व्यवस्थापक प्रशांत भंडारी, राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, संजय बोरा, दिनेश फिरोदिया, सुनील गांधी, नरेंद्र कोठारी. सौ. उज्वला दारूणकर, सौ. पवार, बचत प्रतिनिधी, सभासद उपस्थित होते.

चेअरमन अभय पितळे पुढे म्हणाले, स्व. सुवालाल गुंदेचा यांनी सुरूवातीपासूनच शिस्तबद्ध कारभार करण्यावर भर दिला. त्यामुळे संस्थेने स्पर्धेच्या युगातही अतिशय चांगली वाटचाल करीत मोठी प्रगती केली. पतसंस्थेने स्थापनेपासून सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे. ऑडिट 'अ' वर्ग कायम राखला आहे. सुरूवातीपासून कायम नफा मिळवण्याची कामगिरी पतसंस्थेने केली आहे.

यावेळी संचालक संतोष गांधी, मनोज गुंदेचा, राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी यांनी स्व. गुंदेचा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून मनोगत व्यक्त केले.

# क्रिकेटच्या मैदानावरील 'दव' समस्येवर नगरच्या 'तिरुपती ग्रो इंडस्ट्रीज' चा उपाय

## आयपीएल २०२६ मध्ये 'ड्यूक्युअर'चा डंका




नगर – भारतीय क्रिकेट मैदानांवरील खेळाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि सामन्यांमधील पारदर्शकता टिकवण्यासाठी अहिल्यानगरच्या तिरुपती ग्रो इंडस्ट्रीज या कंपनीने एक क्रांतिकारी तंत्रज्ञान आणले आहे. अमेरिकेतील अत्याधुनिक 'ड्यूक्युअर' हे तंत्रज्ञान भारतात आयात करून कंपनीने आयपीएल २०२६ आणि आगामी क्रिकेट हंगाम ांसाठी मैदानावरील दव समस्येवर कायमस्वरूपी तोडगा उपलब्ध करून दिला आहे. यामुळे रात्रीच्या सामन्यात मैदानावर दंव पडल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांवर मात करण्यात यश आले आहे.

जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान असलेले ड्यूक्युअर हे रसायन अमेरिकेतील मेजर लीग बेसबॉल आणि गोल्फ कोर्सेसमध्ये वापरले जाते. तिरुपती ग्रो इंडस्ट्रीज ही या उत्पादनाची भारतातील अधिकृत आयातदार आहे. रात्रीच्या सामन्यात मैदानावर पडणाऱ्या दवामुळे चेंडू निसरडा होतो, ज्याचा फटका गोलंदाजांना बसतो. ड्यूक्युअर गवतावर एक जलरोधक आवरण तयार करते, ज्यामुळे चेंडू दोन्ही डावात कोरडा राहतो.

या तंत्रज्ञानामुळे नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण निवडण्याचा फायदा कमी होईल आणि दोन्ही संघांना खेळाची समान संधी मिळेल.

नुकत्याच झालेल्या टि २० विश्वचषक २०२६ मध्ये मुंबईतील वानखेडे आणि चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर याचा यशस्वी प्रयोग करण्यात आला आहे. आयसीसी ने सुद्धा याची नोंद घेऊन बीसीसीआय कडून माहिती घेतल्याचे कळते.

कंपनीचे संचालक रोहित खटोड आणि सुमित खटोड यांच्या नेतृत्वाखाली ही कंपनी आज अहिल्यानगरचा अभिमान बनली आहे. तिरूपती ग्रो इंडस्ट्रीज कंपनी बीसीसीआय आयपीएल मैदाने आणि प्रतिष्ठित कोर्सेसना आणि सर्व ठिकाणच्या लॉन साठी खते व रसायने पुरवणारी भारतातील क्रमांक १ ची स्पोर्ट्स फर्टिलायझर कंपनी बनली आहे. या तंत्रज्ञानामुळे आता क्रिकेट सामने केवळ नशिबावर (नाणेफेकीवर) अवलंबून न राहता कौशल्य आणि रणनीतीवर आधारित होतील, असा विश्वास क्रीडा तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : मो. ९४२२२२०१५८.

# वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिलच्या वित्तीय बाजार व गुंतवणूकदार संरक्षण समितीवर सीए पवनकुमार दरक



नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) च्या वेस्टर्न इंडिया रिजनल कौन्सिल (डब्ल्यूआयआरसी) तर्फे सीए पवनकुमार दरक यांची २०२६–२७ या वर्षासाठी वित्तीय बाजार व गुंतवणूकदार संरक्षण समितीच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीबाबत बोलताना डब्ल्यूआयआरसीचे अध्यक्ष सीए सौरभ अजमेरा यांनी सांगितले की, सीए दरक यांचा अनुभव, मार्गदर्शन आणि मोलाचे विचार समितीला तिची उद्दिष्टे यशस्वीपणे साध्य करण्यास मोठी मदत करतील. गुंतवणूकदार जागरूकता वाढवणे आणि वित्तीय बाजारांची पारदर्शकता बळकट करणे यासाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सीए पवनकुमार दरक यांना भांडवली बाजार (कॅपिटल मार्केट) आणि वित्तीय नियोजन (फायनान्सियल प्लॅनिंग) या क्षेत्रात व्यापक अनुभव आहे. गुंतवणूक सल्लागार आणि आर्थिक नियोजन क्षेत्रातील त्यांच्या कार्याची विशेष दखल घेतली जाते. याशिवाय, ते डब्ल्यूआयआरसी अंतर्गत आयसीएआयच्या अहमदनगर शाखेचे माजी अध्यक्ष राहिले असून, त्यांच्या कार्यकाळात व्यावसायिक विकास आणि सदस्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. त्यांच्या या नियुक्तीमुळे गुंतवणूकदार संरक्षण, वित्तीय साक्षरता वाढ आणि मजबूत वित्तीय बाजार उभारणीसाठी समितीचे प्रयत्न अधिक प्रभावी होतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



तपोवन केंद्रात श्री स्वामी समर्थ यांच्या पुण्यतिथी उत्सव सप्ताहाची सांगता केंद्र प्रतिनिधी श्री व सौ.सोनाली बबन पालवे यांच्या हस्ते महानैवद्य महाआरती ने करण्यात आली. यावेळी महिला, पुरुष उपस्थित होते (छाया – विजय मते)

# तपोवन केंद्रात श्री स्वामी समर्थ यांची पुण्यतिथी उत्सवाची उत्साहात सांगता

नगर – सावेडी उपनगरातील नगर छत्रपती संभाजीनगर रोडवरील तपोवन येथील श्री स्वामी समर्थ महाराज यांची तपोवन केंद्रात पुण्यतिथी उत्सव सप्ताहाची सांगता महानैवेद्य महाआरती, महाप्रसादाने उत्साहात झाली.

सावेडी उपनगरात तपोवन रोड येथील तपोवन केंद्रात श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी उत्सव निमित्त पारायण सोहळा पार पडला. यावेळी २४९ महिलांनी सामूहिक श्री गुरुचरित्र पारायण वाचन केले. गेले सात दिवस नित्यनियमाने पारायण सोहळा, अखंड नामजप, आरती असे धार्मिक कार्यक्रम पार पडले. दिंडोरी प्रणित गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन केंद्रात वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होते. बाल संस्कार वर्गामुळे देखील चांगले विद्यार्थी येथे घडत आहेत.

येथील केंद्र प्रतिनिधी श्री व सौ.सोनाली बबन पालवे यांच्या हस्ते महानैवेद्य अर्पण करून महाआरती करण्यात आली. याप्रसंगी नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, संध्याताई पवार, माजी नगरसेविका रूपालीताई वारे, आकाश त्र्यंबके आदींसह स्वामी समर्थ यांचे सेवेकरी उपस्थित होते. या सप्ताह मध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. केंद्राचे काम पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले. महानैवेद्य आरती झाल्यावर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला.

सप्ताह यशस्वी करण्यासाठी तपोवन केंद्राचे सर्व सेवेकरी, कार्यकर्ते, नागरिकांनी परिश्रम घेतल्याबद्दल बबन पालवे यांनी आभार मानले.

# नगरमध्ये २१ एप्रिल रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया, नेत्र व आरोग्य तपासणी शिबिर

नगर – भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निमित्ताने २१ एप्रिल रोजी दिल्लीगेट येथील शमी गणपती समोर, अहिल्यानगर येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालयाच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तसेच नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नेत्रचिकित्सक डॉ. आनंद किशोर बोज्ञा यांनी दिली.

या शिबिरामध्ये नागरिकांसाठी संपूर्णपणे मोफत सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असून, मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू (कॅटरॅक्ट) निदान व शस्त्रक्रियेबाबत मार्गदर्शन, तसेच रक्तदाब (बीपी) व मधुमेह (शुगर) तपासणी केली जाणार आहे. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून रुग्णांना आवश्यक ते वैद्यकीय सल्ले दिले जाणार आहेत.

विशेष म्हणजे, ज्या रुग्णांमध्ये मोतीबिंदू आढळून येईल, अशा रुग्णांसाठी पुणे येथील एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय येथे शस्त्रक्रियेसाठी येण्या–जाण्याचा संपूर्ण खर्च मोफत करण्यात येणार आहे. याशिवाय रुग्णांच्या सोयीसाठी तेथे उत्तम दर्जाचे मोफत जेवणही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. त्यामुळे गरजू रुग्णांना कोणताही आर्थिक भार न पडता उपचाराची संपूर्ण सुविधा मिळणार आहे.

सामाजिक जाणीव आणि आरोग्य सेवेचा प्रसार या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये पूर्णतः विनामूल्य सेवा देण्यात येणार असल्याने, नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी वेदांत व्यंकटेश बोमादंडी (मो. ७७५७८१५९८९) यांच्याशी संपर्क साधावा.

# गायत्री क्षीरसागर यांना पीएचडी प्रदान



नगर – केडगाव येथील गायत्री मुंजाजी पांचाळ (गायत्री महेश क्षीरसागर) यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने हिंदी विषयात आचार्य (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे. त्यांनी 'रामचरितमानस एवं भावार्थ रामायण का तुलनात्मक अध्ययन' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला.

संशोधनासाठी पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या हिंदी विभागाध्यक्षा डॉ. अपर्णा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे संशोधन पूर्ण केले, तसेच विद्यापीठाचे हिंदी विभाग अध्यक्ष डॉ. संजय राठोड, डॉ. अशोक देशमाने व डॉ. सर्जेराव जिगे यांचे सहकार्य लाभले.



## महालक्ष्मी मित्र मंडळाकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कल्याण रोडवरील महालक्ष्मी मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला ॲड. युवराज शिंदे, ज्येष्ठ वकील सुरेश लगड, कुंडलिक आरवडे, लक्ष्मण खोडदे, भास्कर तावरे, सुधाकर बोल्ली, सचिन बुरा, राजू पाडळे, ऋषिकेश तिखे, शेषराव आगळे, शंकर डुकरे, गणेश बेरड, अरुण ढाकणे, अशोक जाधव, सुनील राऊत, सोनटक्के सर आदींसह समाज बांधव उपस्थित होते. (छाया : लहू दळवी)



फ्रेंडस् कॉर्पोरेट क्रिकेट लीगमधील सामन्यांमध्ये नगर चॅम्पियन व नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्सचे खेळाडू.

# फ्रेंडस् कॉर्पोरेट क्रिकेट लीगमधील सामन्यांमध्ये नगर चॅम्पियन व नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्सचा विजय

नगर – फ्रेंडस् कॉर्पोरेट क्रिकेट लीगमधील सामन्यांमध्ये चुरशीची लढत १२ एप्रिल रोजी पाहायला मिळाली. पहिल्या सामन्यात शिवराज ॲडव्होकेट वॉरियर्स आणि नगर चॅम्पियन यांच्यात रंगलेल्या सामन्यात नगर चॅम्पियन संघाने थरारक विजय मिळवला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना शिवराज ॲडव्होकेट वॉरियर्स संघाने दमदार फलंदाजी करत ४ गड्यांच्या मोबदल्यात १६८ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात नगर चॅम्पियन संघाने संयमी व आक्रमक खेळ करत ८ गड्यांच्या मोबदल्यात १७१ धावा पूर्ण केल्या आणि सामना आपल्या नावावर केला. या साम न्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संजू आल्हाट याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्स अहिल्यानगर संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ गड्यांच्या मोबदल्यात १५४ धावा केल्या. या धावांचा पाठलाग करताना ए बी ॲक्ट अहिल्यानगर संघाला चांगली सुरुवात मिळाली नाही आणि संपूर्ण संघ १० बाद १३१ धावांवरच मर्यादित राहिला. परिणामी नगर डिस्ट्रिक्ट सिनिअर्स संघाने हा सामना जिंकत आपली ताकद सिद्ध केली. या सामन्यात तेजस करमरकर याने सर्वोत्कृष्ट खेळ करत सामनावीर किताब पटकावला.

दोन्ही सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडाप्रदर्शन करत प्रेक्षकांचे मनोरंजन केले. लीगमधील पुढील सामने अधिक रंगतदार होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

